**महाराष्ट्र शासन**

**क्रमांक : व्हीएलएस १००३/(५४२/२००३)/प्राशि -३**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : ८ जुलै, २००३**

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे / नागपूर

**विषय : सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षी परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर जून २००३ पासून प्राथमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे. परवानगी देण्याविषयीचा शासनाचा निर्णय संबंधित संस्थेस तात्काळ कळविण्यात यावा.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| १ | विनित एज्युकेशन चॅरिटेबल इन्स्टि.१,आनंदनगर,पुणे | वडगांव(बु,)पुणे -४१ | इंग्रजी |
| २ | संबोधी मल्टीपरपज फाऊंडेशन चंद्रपूर | भिवापूर वार्ड, चंद्रपूर | इंग्रजी |
| ३ | श्री.असीमकुमार सराफ मेमोरियल संस्था,तुमसर जि. गोंदिया | तिरोडा, जि. गोंदिया | इंग्रजी |

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

**(अ. गो. घोटेकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे/चंद्रपूर/गोंदिया
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

(3)

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका,
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन,जुना तोफखाना,
शिवाजीनगर, पुणे– ४११००५.
जा.क्र. ३०५ खाप्राशा/ ०५ – ०६
दिनांक — २५।८।२००६

व्यवस्थापक/शाळाप्रमुख
ज्ञानदीप. इंग्लिश. स्कूल.....
.वडगाव. बु. पुणे........

विषय : कायम विनाअनुदानित तत्त्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडया मंजुरीबाबत.

संदर्भ : शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.पी.एल.एस.१००२ (१०००/०२) प्राशि – ३ दिनांक २३.०९.२००२

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया – वर्गांना सन २००५ – ०६ या वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही असे रू.२० किंवा रू.१०० .स्टॅम्प पेपरवर लिहून देण्याच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग / तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | इ. २री | नैसर्गिक वर्ग | जून २००४ |
| | | इ. ३री | नैसर्गिक वर्ग | जून २००५. |

अटी व शर्ती :

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून दयावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहीजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या नवीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असवयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विदयार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणा–या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

(सही)
शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

श्री.

कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना,शिवाजीनगर,
जा.क्र. खाप्राशा / ४३०५
दि. ८/२/०७

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
ज्ञानदीप इंग्लिश मीडियम स्कूल,
वडगाव बु।। .. पुणे...

विषय- कायम विनाअनु दानित ततवावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ :१. शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही. एल. एम. १००२(१०००/०२)प्राशि -३ दिनांक २३.१.०३.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक / अतिरिक्त तुकडया/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | शाळेचे माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | इंग्रजी | इ.४थी | नैसर्गिक प्रथम वर्ग | जून २००६. |

अटी व शर्ती:-

१. सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक, व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करुन द्यावयास हव्यात.

२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.

३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

५. सदरशाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.

६. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना,शिवाजीनगर, पुणे
जा.क्र./खाप्राशा/ ५०८०
दिनांक 24 DEC 2008

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,

आनंदीप प्राथ. स्कूल
वडगांव बु।। सिंहगड रोड, पुणे

विषय - कायम विनाअनुदानिततत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ - शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.एन.एस.
प्राशि- ३ दि.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| ०१ | इंग्रजी | ५वी | प्रथम | जून २००७ |
| | | ६वी | प्रथम | जून २००८ |

अटी व शर्ती -

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

(सही)
शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे मनपा
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन,
जुना तोफखाना,शिवाजीनगर, पुणे
जा.क्र./खाप्राशा/८४०३
दिनांक 0 3 DEC 2009

व्यवस्थापक/शाळाप्रमुख,
ज्ञानदीप प्रायमरी स्कूल,
स.नं. ५३/१/१ ,वडगाव बु ||
पुणे-४११०४१

विषय - कायम विनाअनुदानिततत्वावरील मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचे वर्ग/ अतिरिक्त तुकड्या मंजुरीबाबत.

संदर्भ - शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.एल.एस.
प्राशि- ३ दि.

संदर्भांकित शासन निर्णयानुसार तुमच्या शाळेतील खाली नमूद केलेल्या इयत्तांच्या नैसर्गिक/अतिरिक्त तुकड्या/वर्गांना कायम विनाअनुदानित तत्वावर भविष्यात अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही या अटीवर मान्यता देण्यात येत आहे.

| अनु. | माध्यम | इयत्ता | वर्ग/ तुकडी | मंजुरीचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| | इंग्रजी | ७ वी | प्रथम वर्ग नै. वाढ | जून २००९ |

अटी व शर्ती -

१. सदर शाळेने तुकड्यांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व्यवस्थापन विषय सुविधा उपलब्ध करून द्यावयास हव्यात.
२. शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
३. शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या आवश्यक शिक्षक उमेदवार शासनाने वेळोवेळी विहीत वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
४. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
५. सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या निकषानुसार पुरेशी असणे आवश्यक आहे.
६. सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अनैसर्गिक स्पर्धा करू नये.

शिक्षणप्रमुख,
शिक्षणमंडळ पुणे महानगरपालिका

९७८७५/१०

तातडीची
कायम विनाअनुदान

जा.क्र.माध्य.३/१४/नमाशा/पुणे/२००४
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : - 4 AUG 2004

प्रति

सचिव,
विनित एज्युकेशनल चॅरिटेबल इन्स्टिट्युशन,
विनित, वनलक्ष्मी सोसायटी, आनंदनगर, पुणे-५१.

**विषय :** २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत. .

**संदर्भ :** १. शासन पत्र क्र. नमाशा/१००४/(३७८/२००४)/माशि-१, दिनांक ५.७.२००४
२. मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/१००१ के/नमाशा/६५१७०/१५-क, दि. १८.९.२०००

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | विनित एज्युकेशनल चॅरिटेबल इन्स्टिट्युशन, विनित, वनलक्ष्मी सोसायटी, आनंदनगर, पुणे-५१. | वडगांव, बुद्रुक, जि. पुणे | आठवी | इंग्रजी |

कायम विना अनुदान

आपल्या शाळेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींचा तसेच खालील नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

१. इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही किंवा विद्यार्थ्यांच्या फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र सादर करावे.
२. सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे (उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत) तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
३. आपल्या संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.
४. आपण आपल्या संस्थेच्या अध्यक्षांचे सदरची माध्यमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र (रु. २०/- च्या स्टँप पेपरवरील) आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे प्रतिस्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.
५. आपली संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १९६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
६. संस्थेविरुध्द गंभिर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
७. सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
८. सदर संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी नाहीत तसेच सदर संस्थेची एखादी शाळा शासनाने ताब्यात घेण्याचे प्रकरण प्रलंबित नाही.
९. सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.
१०. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन २१०३/(५०/०३) माशि-२, दिनांक २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

सदरचे पत्र प्राप्त होताच वरील १ ते १० विहित बाबींची पूर्तता केली असल्याचे संस्थेने सात दिवसाचे आत आपल्या जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांना आवश्यक त्या कागदपत्रासह/प्रमाणपत्रासह कळवावे.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
आपण संबंधित अटींच्या संदर्भात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची/प्रमाणपत्रांची तपासणी करुन प्रस्ताव तीन दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.
२. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ - यांना सविनय सादर
३. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२. यांना सविनय सादर

महाराष्ट्र शासन

<u>शासन परवानगी आदेश</u>

क्रमांक इंमाशा २०१०/३६६/१०/माशि-१,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक:- ९/२/२०११.

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

विषय :- इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून
इ. ८ वी ते इ. १० वीचे इंग्रजी माध्यमाचे वर्ग
<u>कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.</u>

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०.३.२०१०.
२) संस्थेचा क्र.नमाशा/२३८/२०१०, दि.७/८/२०१० रोजीचा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, <u>विनित एज्युकेशनल चॅरिटेबल इन्स्टीटयूट, वडगांव, पुणे</u> या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या <u>ज्ञानदिप प्रायमरी स्कूल, वडगांव, पुणे ४११ ०४१</u> येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते इ. १० वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.

२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.

३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.

४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकरक राहील.

६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १० वीच्या वर्गांमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.

७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(डॉ. सुवर्णा सि.खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री(शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे / शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, पुणे
सचिव,<u>विनित एज्युकेशनल चॅरिटेबल इन्स्टीटयूट, वडगांव, पुणे</u>
निवड नस्ती, माशि-१.

E:\Shinde FolderNew Eng.form.lwp